

२५
वर्षपूर्ती
रुग्ण सेवा सदन

सत्यं शिवं सुंदरम

# नाना पालकर स्मृती समिति

## ५४ वा वार्षिक कार्यवृत्तांत

(२०२१-२०२२)

FINANCIAL AID TO UNDER PRIVILEGED/POOR PATIENTS IS PROVIDED BY

## NANA PALKAR SMRUTI SAMITI

## WITH FINANCIAL SUPPORT OF

# HDFC securities

WWW.hdfcsec.com

# संस्थेविषयी...

## ''रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा''

नाना पालकर स्मृती समिती गंभीर आजाराने ग्रासलेल्या गरीब व गरजू रुग्णांना प्रामाणिकपणे व ध्येयासक्त वृत्तीने वैद्यकीय मदत देण्यास समर्पित आणि वचनबद्ध आहे. मानवतावादी दृष्टिकोन बाळगून, रुग्णांची आरोग्य चिकित्सा सुरू असताना रुग्ण व त्याचे कुटुंबीय यांना वैद्यकीय उपचारांमधील सर्व शक्य वैद्यकीय आणि इतर सहाय्य समितीमार्फत दिले जाते. समिती गेली ५४ वर्षाहून अधिक काळापासून अविरतपणे रुग्णसेवेचे कार्य करीत आहे.

कै. श्री नारायण हरी पालकर समाजात ''नाना पालकर'' म्हणून लोकप्रिय होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पूर्ण वेळ प्रचारक म्हणून नानांनी समाजात फार मोठे कार्य केले. जनतेची सेवा, गरीब व गरजू रुग्णांना आवश्यक ते सहाय्य व रुग्ण सेवा हेच त्यांनी त्यांच्या आयुष्याचे ध्येय मानले आणि शेवटपर्यंत ते या आदर्शासाठी कटिबद्ध होते. नाना हे एक उत्तम लेखक व कवी होते. आयुष्यभर त्यांनी रुग्णांच्या वेदना आणि दुःख दूर करण्यासाठी अथक परिश्रम घेतले.

१ मार्च १९६७ रोजी नाना पालकरांच्या दुःखद निधनानंतर त्यांचे रुग्ण सेवेचे कार्य पूर्णत्वास नेण्यासाठी नांनाचे अनुयायी, सुहृद व कार्यकर्ते एकत्र आले. त्यातून नाना पालकर स्मृती समितीची स्थापना झाली.

### आमचे ध्येय :

विविध माध्यमातून गरीब रुग्ण व त्यांच्या कुटुंबियांना भावनिक, मानसिक व आर्थिक वैद्यकीय सहाय्य प्रदान करण्यात उच्चस्तरीय उत्कृष्टता प्राप्त करणे.

### आमचे उपक्रम :

- रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना मोफत राहण्याची व्यवस्था
- अन्नपूर्णा योजने अंतर्गत रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना अन्न सुविधा
- डायलिसिस केंद्र ( परळ, सांताक्रुझ व बोरीवली)
- सामान्य व गोरगरीब जनतेसाठी नाममात्र दरात आधुनिक व संगणीकृत रक्त तपासणी केंद्र
- रुग्णवाहिका सेवा
- क्षयरोग रुग्णांसाठी मोफत तपासणी व औषधे
- क्षयरोग रुग्णालय, शिवडी येथील रुग्णांना फळे व खजुर वाटप तसेच वाडिया बाल रुग्णालयातील मुलांना फळे वाटप
- गरीब व गरजू रुग्णांसाठी वैद्यकीय आर्थिक मदत
- सामान्य जनतेसाठी तज्ज्ञ व अनुभवी तज्ज्ञांमार्फत वैद्यकीय चिकित्सा
- रक्तदान शिबिरांचे आयोजन
- घरगुती वापरासाठी नाममात्र शुल्कात अत्यावश्यक वैद्यकीय उपकरणे
- बोरीवली येथे सामान्य व गोरगरीब जनतेसाठी बाह्य रुग्ण विभाग
- बोरीवली व ठाणे येथे फिजिओथेरपी केंद्र
- समुपदेशन केंद्र
- सामान्य जनतेसाठी विशेषतः महिलांसाठी वैद्यकीय जागरुकता कार्यक्रमांचे आयोजन
- ठाणे सिव्हिल रुग्णालयात नवजात बालकांना कपडे वाटप
- मसाज व योग वर्ग
- रुग्णांना समितीच्या केंद्रावर जास्तीत जास्त लाभ मिळवून देण्यासाठी संसाधने, मालमत्ता, उपकरणे आणि मनुष्यबळ वाढविणे व सक्षम करणे.
- रुग्णांच्या उपचार प्रक्रियेमध्ये रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना शारिरीक व मानसिक आधार देणे.
- समितीचे सभासद, देणगीदार, हितचिंतक, कर्मचारी वर्ग तसेच पुरवठादार यांच्या अनुभवाने, कौशल्याने व सहकार्याने समितीच्या उपक्रमात उत्कृष्टता वाढविणे.
- समितीच्या कार्याचा आढावा, लाभार्थ्यांची आकडेवारी याची पारदर्शक माहिती सादर करणे.

# नाना पालकर स्मृती समिती

## व्यवस्थापकीय समिती सदस्य

### २०२१-२२

| | | |
|---|---|---|
| १. | डॉ. श्रीकांत बडवे | अध्यक्ष |
| २. | डॉ. हेमा कण्णन | उपाध्यक्षा |
| ३. | श्री. श्रीराम दांडेकर | कार्याध्यक्ष |
| ४. | श्री. सतीश जेऊरकर | कोषाध्यक्ष |
| ५. | श्री. अविनाश खरे | मानद् सचिव |
| ६. | श्रीमती सुमेधा जोशी | सह सचिव |
| ७. | श्री. जनार्दन कढे | सदस्य |
| ८. | डॉ. जयंत पटवर्धन | सदस्य |
| ९. | श्री. किरण करलकर | सदस्य |
| १०. | श्री. विवेक छत्रे | सदस्य |
| ११. | श्री. नितीन देशमुख | सदस्य |
| १२. | श्री. प्रसन्न जोशी | सदस्य |
| १३. | श्री. प्रविण परब | सदस्य |
| १४. | श्री. दिलीप केतकर | स्वीकृत सदस्य |
| १५. | श्रीमती भारती वैद्य | स्वीकृत सदस्य |

## निमंत्रित

१. डॉ. अमरबहादूर ठाकोर
२. श्री. सुधाकर भाटोडेकर
३. श्रीमती स्मिता बेडेकर
४. डॉ. प्रशांत अमोणकर
५. डॉ. परेश नवलकर
६. श्री. सतिश तांबा
७. श्रीमती स्मिता मोहळे

*नाना पालकर स्मृती समिती*

# नाना पालकर स्मृती समिती

**(नोंदणी क्र. : एफ् २८७४)**

रुग्ण सेवा सदन, १५८, रुग्ण सेवा सदन मार्ग, डॉ. आंबेडकर रोड, परळ, मुंबई - ४०० ०१२.
दूरध्वनी : (०२२) २४१६ ४८९० / २४१० २१६७ / २४१८ ६७२४
E-mail : nanapalkar15@gmail.com ● Website : www.npss.org

| | |
|---|---|
| ❐ **गोखले डायलिसिस केंद्र**<br>९ वा मजला, रुग्ण सेवा सदन,<br>१५८, रुग्ण सेवा सदन मार्ग,<br>डॉ. आंबेडकर रोड, परळ, मुंबई - ४०० ०१२.<br>फोन : ०२२-२४१६४८९०/२४१०२१६७ | ❐ **तुलसियानी स्पेशालिटी लॅबोरेटरी**<br>८ वा मजला, रुग्ण सेवा सदन,<br>१५८, रुग्ण सेवा सदन मार्ग,<br>डॉ. आंबेडकर रोड, परळ, मुंबई - ४०० ०१२.<br>फोन : ०२२-२४१८०८५५ |
| ❐ **प्रभाकर कुटुंब कल्याण केंद्र**<br>८ वा मजला, रुग्ण सेवा सदन,<br>१५८, रुग्ण सेवा सदन मार्ग,<br>डॉ. आंबेडकर रोड, परळ, मुंबई - ४०० ०१२.<br>फोन : ०२२-२४१६४८९०/२४१०२१६७ | ❐ **नाना पालकर चिकित्सालय**<br>१ ला मजला, रुग्ण सेवा सदन,<br>१५८, रुग्ण सेवा सदन मार्ग,<br>डॉ. आंबेडकर रोड, परळ, मुंबई - ४०० ०१२.<br>फोन : ०२२-२४१६४८९०/२४१०२१६७ |
| ❐ **कै. डॉ. शिवानंद लवेकर दवाखाना**<br>ए-५, श्रद्धा शॉपिंग सेंटर, तळमजला,<br>जेरबाई वाडीया रोड,<br>परळ, मुंबई - ४०० ०१२. | ❐ **सांताक्रुझ डायलिसिस केंद्र**<br>द्वारा, महर्षि दधिचि हॉस्पिटल,<br>सांताक्रुझ बस डेपो आणि रेल्वे स्टेशन जवळ,<br>सांताक्रुझ (पू.), मुंबई - ४०० ०५५.<br>फोन : ०२२-२६१२३००६/२६१२४२५९ |
| ❐ **बोरीवली केंद्र**<br>प्लॉट नं. २३८, टी.पी.एस. रोड-III,<br>बाभई, बोरीवली (प.),मुंबई - ४०० ०९१.<br>फोन : ०२२-२८९८३०२९<br>मो. +९१ ९३२६३६३११३ | ❐ **बोरीवली डायलिसिस केंद्र**<br>एक्सर मेटर्निटी होम अॅन्ड डिस्पेन्सरी प्रिमायसेस,<br>१ ला मजला, डी. डी. बोरगे मार्ग, एक्सर रोड,<br>बोरीवली (प.), मुंबई - ४०० ०९२.<br>फोन : ०२२-२८९०१०९६ / +९१ ९३२१७९५८०५ |
| ❐ **बोरीवली केमोथेरपी केंद्र**<br>गणेश सिद्धी -२, पहिला मजला,<br>वजिरा नाका, बोरीवली (प.)- ४०० ०९२. | ❐ **ठाणे केंद्र**<br>फ्लॅट नं. १, बिल्डीग नं. ८२-अ,<br>वृंदावन कॉम्पलेक्स, ठाणे (प.)- ४०० ६०१<br>फोन : +९१ ७०४५१६४९८ |

❐ **ठाणे रुग्ण सेवा व फिजिओथेरपी केंद्र**
फ्लॅट नं. ५-६, बिल्डीग नं. ९०,
वृंदावन कॉम्पलेक्स, ठाणे (प.)- ४०० ६०१
फोन : ०२२-२५३७९६३४

रुग्ण सेवा = ईश्वर सेवा या ध्येयाने प्रेरित होऊन गेली ५४ वर्ष नाना पालकर स्मृती समिती समाजातील गोरगरीब व वंचित घटकांसाठी अविरतपणे रुग्णसेवेचे कार्य करीत आहे.

देशाच्या विविध भागातून मुंबईमध्ये उपचारासाठी आलेले गरीब रूग्ण व त्यांच्या नातेवाईकांना राहण्याची फार मोठी समस्या भेडसावत असते. कर्करोगाच्या व इतर काही रुग्णांना उपचारा दरम्यान रुग्णालयात दाखल करण्याची गरज नसते परंतु उपचाराच्या कालावधीत त्यांना रुग्णालयाच्या जवळच रहावे लागते. अश्या गरीब व गरजू रुग्णांना मोफत राहण्याची व्यवस्था व्हावी या उद्देशाने समितीने सन १९६८ साली चार खोल्यांच्या जागेमध्ये रुग्णांसाठी निवासगृह सुरु केले. परंतु ही व्यवस्था अपुरी होती. त्यासाठी समितीने सन १९९७ साली परळ येथे रुग्ण सेवा सदनाची उभारणी केली. रुग्ण सेवा सदनास यावर्षी २५ वर्ष पूर्ण झाली असून देशातील सर्वसामान्य व गोरगरीब जनतेसाठी आधारवड ठरले आहे. हे जरी खरे असले तरी आजही ही सेवा अपुरी आहे. आजही देशभरातून मुंबईमध्ये उपचारासाठी आलेल्या रुग्णांना फुटपाथवर रहावे लागत आहे. समितीस जागा उपलब्ध झाल्यास या रुग्णांसाठी नवीन रुग्ण सेवा सदन उभारण्याचा समितीचा मानस आहे.

आपणास माहीतच आहे, मागील वर्षी कोरोना महामारीच्या दुसऱ्या लाटेने जीवघेणे संकट ओढवले होते. या साथीच्या प्रारंभापासून समिती या लढाईत आघाडीवर आहे. या अडचणीच्या काळात देखील समितीने सर्वसामान्य व गोरगरीब जनतेसाठी रुग्णसेवेचे कार्य सुरु ठेवले आहे. समितीने बूट पॉलिश करणारे, हमाल व इतर वंचित घटकातील ३००० पेक्षा जास्त लोकांचे मोफत कोविड लसीकरण केले. या साथीच्या काळात रक्ताचा फार मोठा तुटवडा जाणवत होता. यासाठी समितीने दोन रक्तदान शिबिरांचे आयोजन करून टाटा मेमोरियल रुग्णालयास १८५ तर कामा रुग्णालयास १३४ रक्त बाटल्या जमा करून दिल्या. तसेच ठाणे येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

मागील वर्षातल्या उल्लेखनीय बाबी म्हणजे, समितीच्या बोरीवली येथील रुग्णसेवा केंद्रा समोरील रस्त्याला महानगर पालिकेमार्फत 'नाना पालकर स्मृती समिती मार्ग' असे नाव देऊन गौरविण्यात आले. तसेच समितीने आजवर केलेल्या कार्याची दखल घेऊन ग्रंथाली आणि ॲडफीज यांच्यातर्फे समितीस 'ध्यास सन्मान' हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्डस्, इंग्लंड यांच्या मार्फत आयोजित रक्तदान शिबिरामध्ये सहभागी झाल्याबद्दल 'इंटरनॅशनल लाईफ सेव्हर अवॉर्ड'ने समितीस सन्मानित करण्यात आले.

सन २०२१–२२ या वर्षात समितीने महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजने अंतर्गत १५३ रुग्णांना १९९५३ इतके मोफत डायलिसिस दिलेले आहे. परळ, सांताक्रुझ, बोरीवली व ठाणे या केंद्रावर सर्व उपक्रम सुरळीत सुरु आहेत. बोरीवली व ठाणे येथील फीजियोथेरपी केंद्राचा सर्वसामान्य जनतेस आज उपयोग होत आहे. बोरीवली येथील केमोथेरपी केंद्राचे काम आता अंतिम टप्प्यात आलेले आहे. लवकरच १७ बेडचे हे केंद्र कर्करोगाच्या रुग्णांसाठी सुरु करण्यात येणार आहे. यासाठी टाटा मेमोरियल रुग्णालयाकडून सर्व स्तरावर सहकार्य केले जाणार आहे.

निसर्ग आपल्या सहनशीलतेची वारंवार परीक्षा घेत असतो. सन २०२२ मध्ये रायगड व रत्नागिरी जिल्ह्यातील अनेक गावांना पुराचा सामना करावा लागला. समितीने कार्यकर्त्यांच्या माध्यमातून पूरग्रस्तांना तात्काळ मदत साहित्य पुरविले.

विविध लोकोपयोगी सामाजिक प्रकल्प राबविण्यात सामाजिक दायित्व निधीच्या (CSR) माध्यमातून फार मोठे योगदान मिळत आहे. समितीच्या अनेक उपक्रमांना विविध भागीदारांनी CSR निधी उपलब्ध करून दिला, तसेच वैयक्तिक देणगीदार व इतर संस्थांनी दिलेले आर्थिक योगदान त्याबद्दल या सर्वांचे मनःपूर्वक आभार. महाराष्ट्र शासनाचे आरोग्य खाते, मेडी असिस्ट इन्शुरन्स यांनी महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना (MJPJAY) राबविण्यास मदत केली त्याबद्दल त्यांचेही मनःपूर्वक आभार !

समितीचे आजी – माजी पदाधिकारी, सभासद, कार्यकर्ते, देणगीदार, हितचिंतक व कर्मचारी वृंद यांची रुग्णसेवेची कळकळ, समितीवरील प्रेम आणि अथक परिश्रम यातून हा मनवसेवेचा वटवृक्ष उभा राहिला आहे.

आपली,

**सुमेधा जोशी**

मानद् सचिव

## परळ केंद्र

### सत्यनारायण महापूजा (दि. १३-४-२०२१)

१३ एप्रिल १९९७ रोजी रुग्ण सेवा सदनाच्या वास्तूचे औपचारीक उद्‌घाटन झाले तेव्हापासून दरवर्षी रुग्णसेवा सदनामध्ये या दिवशी श्रीसत्यनारायण महापुजेचे आयोजन केले जाते. यावर्षी देखील श्रीसत्यनारायण महापूजा दिनांक १३ एप्रिल २०२१ रोजी रुग्ण सेवा सदनामध्ये आयोजित करण्यात आली.



### डायलिसिस मशीन उद्‌घाटन (२०.०७.२०२१)

निळकंठ आणि सावित्रिबाई फुले पुरंदरे ट्रस्ट यांनी समितीच्या परळ येथील डायलिसिस केंद्रास एक डायलिसिस मशीनसाठी आर्थिक सहाय्य केले. या मशीनचा उद्‌घाटन कार्यक्रम डॉ. शेखर पुरंदरे व डॉ. अनुजा पुरंदरे यांच्या शुभहस्ते संपन्न झाला.

### कोकणातील पुरग्रस्ताना मदत (२४.०७.२०२१)

अतिवृष्टीमुळे कोकणातील अनेक गावांमध्ये पुर परिस्थिती निर्माण होऊन नागरीकांचे आतोनात नुकसान झाले. समितीने पाणी, वैद्यकीय साहित्य, धान्य व इतर जीवनावश्यक वस्तू गोळा करून समितीच्या स्वयंसेवकांमार्फत वाड्या-वस्त्यांवर मदत वितरीत केली.








### डायलिसिस मशीन उद्‌घाटन (१८.०८.२०२१)

लायन्स क्लब ऑफ मुंबई कार्टर रोड व श्री. दिपक संपत यांनी स्व. श्रीमती ताराबेन संपत आणि स्व. श्री. यशवंत खिमजी संपत यांच्या स्मृती प्रित्यर्थ डायलिसिस मशीन देणगी स्वरूपात देण्यात आली. या कार्यक्रमास लायन्स क्लबचे श्री. अजय बाबला, सौ. व श्री. दिपक संपत उपस्थित होते.

### डायलिसिस मशीन उद्‌घाटन (०८.०९.२०२१)

स्वर्गीय श्रीमती वसंत मुलजी तन्ना आणि स्वर्गीय श्री. मुलजी के. तन्ना यांच्या स्मृती प्रित्यर्थ डायलिसिस मशीन देणगी स्वरूपात देण्यात आली. श्री. पंकज तन्ना व त्यांच्या कुटुंबीयांच्या हस्ते या डायलिसिस मशीनचे उद्‌घाटन करण्यात आले.




# परळ केंद्र

## लॅब मशीन उद्‌घाटन (दि. १८-०५-२०२१)

श्री. अविनाश खरे यांच्या द्वारे
स्व. श्री. रामभाऊ यांच्या स्मृती प्रित्यर्थ
समितीच्या रक्त तपासणी केंद्राकरीता
बायो केमेस्ट्री (EM200) मशीन देणगी
स्वरूपात देण्यात आली.





## वैद्यकिय सामाजिक कार्यकर्त्यांची बैठक (२२.०९.२०२१)



रुग्णालयातील वैद्यकीय सामाजिक कार्यकर्त्यांमार्फत समितीतर्फे गरीब रुग्णांना आर्थिक वैद्यकीय मदत दिली जाते. या उपक्रमाचा आढावा घेण्यासाठी विविध रुग्णालयातील वैद्यकीय सामाजिक कार्यकर्त्यांची बैठक समितीच्या उपाध्यक्षा डॉ. हेमा कण्णन, सचिव श्री. अविनाश खरे व श्री. शेखर वेलणकर यांच्या उपस्थितीत घेण्यात आली.

## रक्तदान शिबिर (२४.१०.२०२१)

नाना पालकर स्मृती समिती आणि रोटरी क्लब ऑफ मुंबई सायन यांच्या संयुक्त विद्यमाने व कामा रूग्णालयाच्या सहभागाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. स्त्री रोगतज्ञ डॉ. अपर्णा शिंदे, श्री. सुरेंद्र भगत, अध्यक्ष, रोटरी क्लब ऑफ मुंबई सायन व जिल्हा गव्हर्नर श्री. राजेंद्र अगरवाल यांच्या प्रमुख उपस्थितीत शिबिर संपन्न झाले. डॉ. अपर्णा शिंदे यांनी या शिबीरात स्वत: रक्तदान केले. या रक्तदान शिबिरात एकूण १३४ युनिट रक्त संकलित करून कामा रुग्णालयास देण्यात आले. या कार्यक्रमास कार्यकारीणी सदस्य श्री. किरण करलकर, श्री. नितीन देशमुख उपस्थित होते.






## गरज अवयवदानाची (२१.११.२०२१)

अवयवदानाचे महत्व लोकांना समजावे याकरीता अवयवदान जनजागृती अभियान रूग्ण सेवा सदनात स्नेह परिवार व मुंबई व्यापारी महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने 'गरज अवयवदानाची' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. द फेडरेशन ऑफ ऑर्गन अॅन्ड बॉडी डोनेशनचे संस्थापक, श्री. पुरूषोत्तम पवार यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

# परळ केंद्र

## डायलिसिस मशीन उद्घाटन (१८.१२.२०२१)

श्री. एल. व्ही. केशव यांच्याकडून कै. श्रीमती उषा केशव यांच्या स्मरणार्थ डायलिसिस मशीन देणगी स्वरूपात देण्यात आली. या कार्यक्रमास श्री. एल. व्ही. केशव व त्यांची कन्या सौ. स्वप्ना हरिहरन, जावई श्री. रमेश हरिहरन व त्यांचे निकटवर्तीय उपस्थित होते.





## नेत्रचिकित्सा शिबिर (१९.१२.२०२१)

नाना पालकर स्मृती समिती आणि रोटरी क्लब ऑफ मुंबई सायन यांच्या संयुक्त विद्यमाने व आदित्य ज्योत फाऊंडेशन यांच्या सहभागाने नेत्रचिकित्सा शिबिराचे आयोजन करण्यात आले. रोटरी क्लबचे अध्यक्ष, श्री. सुरेंद्र भगत व नाना पालकर स्मृती समितीचे विश्वस्त, श्री. सुधाकर भाटोडेकर यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. या शिबिरात एकूण १२३ व्यक्तींचे डोळे तपासण्यात आले असून ७२ जणांना मोफत चष्मा देण्यात आला. तसेच मोतिबिंदू व काचबिंदू विषयी मार्गदर्शन करण्यात आले.

## प्रजासत्ताक दिन आणि डॉ. परळकर पुस्तक प्रकाशन (२६.०१.२०२२)



नाना पालकर स्मृती समितीमध्ये प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. श्री. भरत गुर्जर, माजी नगरसेवक, भाजपा यांच्या हस्ते राष्ट्रध्वज फडकवून ध्वजास मानवंदना देण्यात आली. या दिवसाचे औचित्य साधून समितीचे संस्थापकीय विश्वस्त डॉ. माधवराव परळकर यांच्या परिचय पुस्तिकेचे प्रकाशन समितीचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत बडवे यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी समितीचे कार्याध्यक्ष श्री. श्रीराम दांडेकर, खजिनदार श्री. प्रसन्न जोशी, सहसचिव श्रीमती सुमेधा जोशी, विश्वस्त श्री. विवेक छत्रे, श्री. प्रविण परब, श्री. सुधाकर भाटोडेकर उपस्थित होते.



## महिला दिन (०८.०२.२०२२)

नाना पालकर स्मृती समिती तर्फे महिला दिना निमित्त रूग्ण सेवा सदनातील महिला रूग्ण व इतर महिला वर्गासाठी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास चांगला प्रतिसाद मिळाला.

## परळ केंद्र



### रुग्ण सेवा दिन

(०६.०३.२०२२)

१ मार्च हा स्व. नाना पालकर यांचा स्मृतिदिन. या दिवसाचे औचित्य साधून समिती गेली २४ वर्षे रुग्णसेवा दिनाचे आयोजन करीत आहे. या काळात आरोग्य क्षेत्रात काम करणाऱ्या अनेक समाज-सेवकांचा व संस्थांचा समितीने सन्मान केलेला आहे. समितीमध्ये कार्यरत असणारे डॉक्टर्स, डायलिसिस व लॅब तंत्रज्ञ, सेवकवर्ग व इतर कर्मचाऱ्यांनी कोरोनासारख्या महाभयंकर साथीच्या काळात समितीचे सर्व उपक्रम अखंडपणे सुरु ठेवले. समितीच्या कार्यातील त्यांचे योगदान, अविरत सेवा आणि मेहनत यांसाठी रुग्णसेवा दिनाच्या निमित्ताने 'कोविड योद्धा' या पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले. सेवा विभागाचे प्रमुख श्री. विवेकजी भागवत व समितीचे माजी कार्याध्यक्ष व सेवा सहयोग फाऊंडेशनचे संचालक श्री. रविंद्रजी कर्वे यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी समितीच्या उपाध्यक्षा डॉ. हेमा कण्णन, खजिनदार श्री. प्रसन्न जोशी, सहसचिव श्रीमती सुमेधा जोशी, कार्यकारिणी सदस्य श्री. विवेक छत्रे, श्री. किरण करलकर, श्री. प्रविण परब. श्री. दिलीप केतकर, श्रीमती भारती वैद्य, श्री. सुधाकर भाटोडेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

### रक्तदान शिबिर

(२७.०३.२०२२)

कै. सुरेखा दिनकर हुनगुंद यांच्या स्मृती प्रित्यर्थ व टाटा रुग्णालयाच्या सहभागाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.
श्री. दिनेशजी वालेचा आणि समितीचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत बडवे यांच्या प्रमुख उपस्थितीत, दिप प्रज्वलन करून शिबिराची सुरुवात करण्यात आली. श्री. दिनेशजी वालेचा यांनी कोविड काळात टाटा हॉस्पिटल मध्ये २५ वेळा प्लेटलेट दान केले आहे. या रक्तदान शिबिरामध्ये १८५ युनिट रक्त संकलित करून टाटा रुग्णालयास देण्यात आले.





### डायलिसिस मशीन उद्घाटन

(३१.०३.२०२२)

निचल ईसरानी फाऊंडेशने गोखले डायलिसिस केंद्राला एक डायलिसिस मशीन देणगी स्वरूपात दिली. श्री. महिंदर पुनवानी, संचालक, निचल इसरानी फाऊंडेशन यांच्या हस्ते डायलिसिस मशीनचे उद्घाटन करण्यात आले.

## सांताक्रुझ केंद्र

### डायलिसिस मशीन उद्घाटन
(०३.०८.२०२१)

क्वेस्ट फाऊंडेशनने समितीच्या सांताक्रुझ डायलिसिस केंद्रासाठी ४ डायलिसिस मशीन देणगी स्वरूपात दिल्या. क्वेस्ट फाऊंडेशनचे विश्वस्त श्री. भरतशेठ व श्री. पंकज तन्ना यांच्या शुभहस्ते मशीनचे उद्घाटन करण्यात आले.



## ठाणे केंद्र

### वर्धापन दिन - रक्तदान शिबीर
(०९.०५.२०२१)

कोरोनाच्या संकटामुळे भयंकर परिस्थिती निर्माण झाली होती. ठाण्यातील रक्तपेढयांना रक्ताचा तुटवडा जाणवत होता. या करीता नाना पालकर स्मृती समिती, ठाणे केंद्राने १३ व्या वर्धापन दिनानिमित्त वामनराव ओक रक्तपेढी, घंटाळी यांच्या सहकार्याने वृंदावन सोसायटी, ठाणे येथे रक्तदान शिबिर आयोजित केले होते. या शिबिरात ३५ युनिट रक्त संकलित करण्यात आले.




### ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर मशिन वाटप

समितीच्या ठाणे केंद्र येथे देणगीदारांच्या मदतीने ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर तात्पुरत्या स्वरुपात कोरोना रुग्णांना मोफत वापरण्यास दिले.



### मोफत ऑर्थोपेडिक वैद्यकीय तपासणी शिबिर
(०९.०५.२०२१)

नाना पालकर स्मृती समिती ठाणे केंद्र व ठाणे येथील कैझान सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने नाना पालकर स्मृती समितीच्या ठाणे येथील फिजिओथेरपी केंद्रामध्ये मोफत ऑर्थोपिडीक वैद्यकीय तपासणी शिबिर आयोजित केले होते. एकूण २३ जणांनी या शिबिराचा लाभ घेतला.

# बोरीवली केंद्र

## ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर मशीन वाटप
(१६.०५.२०२१)




झपाट्याने पसरणाऱ्या कोरोना संसर्गासोबत ऑक्सिजनची मागणी प्रचंड वाढत होती. त्यामुळे ऑक्सिजन सिलिंडरचा तुटवडा निर्माण झाला होता. ऑक्सिजन सिलिंडरला पर्याय म्हणून ऑक्सिजन कॉन्सेन्ट्रेटर हा एक चांगला पर्याय उपलब्ध आहे. कोरोना रुग्णांना घरच्या घरी या मशीनच्या मदतीने ऑक्सिजन देण्याची व्यवस्था केली जाते. या पार्श्वभूमीवर समितीच्या बोरीवली केंद्राने देणगीदारांच्या मदतीने जवळपास २२ ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर तात्पुरत्या स्वरुपात कोरोना रुग्णांना मोफत वापरण्यास दिले. यावेळी जनसेवा केंद्राचे अध्यक्ष, श्री. राधेशाम सिंघानिया, समितीचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत बडवे, आमदार श्री. सुनील राणे, तसेच डॉ. परेश नवलकर, डॉ. केळकर व श्री. संतोष राजवाडे या मान्यवरांच्या हस्ते काही रूग्णांना ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर मशीन देण्यात आली.

## कंटेनरचे उद्घाटन (०६.०८.२०२१)

नाना पालकर स्मृती समिती बोरीवली केंद्रामध्ये सेवा घेणाऱ्या लाभार्थींचा चांगला प्रतिसाद मिळत असल्यामुळे आपणास रूग्णोपयोगी वस्तू ठेवण्यासाठी जागा अपुरी पडू लागली. या रूग्णोपयोगी वस्तू ठेवण्यासाठी स्थानिक आमदार श्री. सुनिल राणे यांनी केंद्राला दोन नवीन कंटेनर उपलब्ध करून दिले. ब्ल्यू क्रॉस लॅबोरेटरीचे कार्यकारी संचालक, श्री. भालचंद्र बर्वे यांच्या हस्ते कंटेनरचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाला डॉ. श्रीकांत बडवे, आमदार श्री. सुनिल राणे, श्री. दिपकजी राणे, श्री. म्हात्रे, डॉ. परेश नवलकर श्री. प्रविण परब, श्री. विवेक छत्रे व श्री. कृष्णा महाडिक उपस्थित होते.



## बोरीवली डायलिसिस केंद्र वर्धापन दिन
(१६.०८.२०२१)

नाना पालकर स्मृती समितीच्या बोरीवली डायलिसिस केंद्राचा पहिला वर्धापन दिन साजरा करण्यात आला. वरीष्ठ पोलिस निरीक्षक, श्री. पवार साहेब, अभिनेते, श्री. सुहास पळशीकर व श्री. प्रमोद नाईक या मान्यवरांच्या हस्ते दिप प्रज्वलन करून कार्यक्रमाला सुरूवात करण्यात आली. श्री. सुनील पाटकर यांनी केंद्राची माहिती दिली. उपस्थित मान्यवरांनी संस्थेला शुभेच्छा दिल्या आणि श्री. प्रविण परब यांनी मान्यवरांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

## बोरीवली केंद्राचे सुशोभिकरण भूमीपुजन सोहळा (१८.०८.२०२१)

बोरीवलीचे स्थानिक आमदार श्री. सुनील राणे यांच्या विकास निधीतून बोरीवली येथील बाभई केंद्राच्या सुशोभिकरणाचे काम करण्यात आले. श्री. सुनील राणे यांच्या हस्ते सदर कामाचा शुभारंभ करण्यात आला. सदर कार्यक्रमास स्थानिक नगरसेविका अंजलीताई खेडकर, नगरसेवक श्री. प्रवीण शहा, श्री. प्रतिक साळवी, श्री. सुरेंद्र गुप्ता, श्री. नीरव गुप्ता, श्री. रामाजोशी, डॉ. परेश नवलकर इतर पदाधिकारी, कार्यकर्ते व हितचिंतक उपस्थित होते.

## बोरीवली (बाभई) केंद्राच्या सुशोभिकरणाचे उद्घाटन

(१२.१२.२०२१)






महाराष्ट्र विधानसभा विरोधी पक्ष नेते माननीय श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या हस्ते बोरीवली (बाभई) केंद्राच्या सुशोभिकरणाचे उद्घाटन करण्यात आले. संरक्षण दल प्रमुख, जनरल बिपीनजी रावत, यांच्या पत्नी आणि त्यांच्या सोबत अपघातात निधन झालेले इतर जवान या सर्वांना प्रथम श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर कार्यक्रमाला सुरूवात करण्यात आली.

डॉ. परेश नवलकर यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत करून बोरीवली केंद्रातील उपक्रमांची माहिती दिली. त्यानंतर समितीचे अध्यक्ष, डॉ. श्रीकांत बडवे यांनी नाना पालकर स्मृती समितीच्या कार्याची व उपक्रमांची माहिती दिली. स्थानिक नगरसेवक श्री. प्रविण शहा यांच्या कार्यवृत्तांताचे प्रकाशन करण्यात आले.

## ''नाना पालकर स्मृती समिती मार्ग'' नामकरण सोहळा (२५.१२.२०२१)







नाना पालकर स्मृती समिती बोरीवली केंद्रातील विविध उपक्रमांद्वारे जवळच्या सर्व विभागातील गरीब व गरजूंना केंद्रातील सुरू असलेल्या सेवेचा लाभ मिळत आहे. केंद्राच्या या कार्याची दखल बृहन्मुबई महानगरपालिकेने घेतली आणि त्यांनी नाना पालकर स्मृती समिती बोरीवली केंद्राच्या समोरील रस्त्याला ''नाना पालकर स्मृती समिती मार्ग'' असे नाव देण्यास मान्यता दिली. दि. २५ डिसेंबर २०२१ रोजी ''नाना पालकर स्मृती समिती मार्ग'' नामकरण सोहळा आयोजित करण्यात आला. रस्त्याचे नामकरण सोहळयाचे उद्घाटन रा.स्व.संघाचे, कोकण प्रांत प्रचारक, डॉ. सतीश मोढ आणि श्री. सुरेंद्र गुप्ता, अध्यक्ष, केशवसृष्टी यांच्या हस्ते झाले. मार्गाच्या नामफलकाच्या उद्घाटना नंतर बोरीवली केंद्राच्या पटांगणांत समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. मंचावर उपस्थित अतिथी डॉ. सतीश मोढ, श्री. सुरेंद्र गुप्ता आणि मान्यवर खासदार, श्री. गोपाळ शेट्टी व आमदार, सुनिल राणे या सर्वांचे समितीचे अध्यक्ष, डॉ. श्रीकांत बडवे, यांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. डॉ. परेश नवलकर यांनी बोरीवली केंद्रातील जुन्या व नवीन उपक्रमांची माहिती उपस्थितांना दिली. त्यानंतर डॉ. श्रीकांत बडवे यांनी स्वर्गीय श्री. नाना पालकर यांची माहिती उपस्थितांना अवगत करून दिली. मोरेश्वर सेवा संघाचे सहकार्यवाह, श्री. मुकुंद फुंवर यांनी स्वर्गीय नाना पालकरांच्या ''यशाने दुमदुमवू त्रिभुवने'' या कवितेचे वाचन केले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी व मान्यवरांच्या मार्गदर्शनपर भाषणानंतर संस्थेच्या सदस्या, सौ. मंगल मेहेंदळे यांनी पसायदानाने कार्यक्रमाची सांगता केली.

# परळ व बोरीवली केंद्रात ३,००० + लोकांना मोफत कोविड लसीकरण

सामाजिक दायित्व निधी (CSR) उपक्रमांतर्गत व सामाजिक संस्थांच्या सहकार्याने समितीने बुट पॉलिश करणारे, हमाल, महिला सफाई कर्मचारी, रिक्षा व टॅक्सीचालक, किन्नर यांच्यासाठी मोफत कोविड लसीकरण शिबिरांचे समितीच्या परळ व बोरीवली केंद्रांमध्ये आयोजन केले. या शिबिरांमध्ये ३,००० पेक्षा जास्त लोकांचे मोफत कोविड लसीकरण करण्यात आले.



कोटक महिंद्रा लाईफ'चे वरीष्ठ उपाध्यक्ष डॉ. मांगरिश रांगणेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत दि. ८ सप्टेंबर २०२१ रोजी पहिले लसीकरण शिबिर समितीच्या परळ केंद्रावर पार पडले.






कोटक महिंद्रा लाईफचे अधिकारी डॉ. मनोज पेंडभाजे यांच्या प्रमुख उपस्थितीत दि. १ ऑक्टोंबर २०२१ रोजी दुसरे लसीकरण शिबिर पार पडले.







नाना पालकर स्मृती समिती, श्रीमती अनुराधा एकनाथ ठाकूर, अथर्व फाऊंडेशन, कै. अमरकांत झा स्मृती प्रतिष्ठान व कोटक महिंद्रा लाईफ यांच्या संयुक्त विद्यमाने बोरीवली केंद्रावर एकूण ५ मोफत कोविड लसीकरण शिबिरांचे आयोजन करण्यात आले.

# व्यवस्थापन

''रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा'' हे व्रत हाती घेऊन नाना पालकर स्मृती समिती मार्फत विविध प्रकारचे उपक्रम प्रतिवर्षी राबविण्यात येतात. उपक्रमांची आखणी व अंमलबजावणी करण्यासाठी नेमलेल्या कार्यकारी समितीच्या ११ सभा यावर्षी घेण्यात आल्या व विविध विषयांवर चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले.

वार्षिक हिशेबाची तपासणी, वैधानिक हिशेब तापसनीस मे. वैशंपायन ॲन्ड असोसिएट्स, सनदी लेखापाल यांच्याकडून झाली असून त्याचा अहवालही कार्यकारिणी समिती समोर ठेवण्यात आला. समितीची वेबसाईट www.npss.org असून ती वेळोवेळी अद्ययावत करून घेण्यात आली आहे.

वित्त कायदा २०२० द्वारे नवीन तरतुदीनुसार प्राप्तीकर कायदा १९६१ च्या अंतर्गत 12 A व 80 G चे नुतनीकरण करण्यात आलेले असून 12 A चा नोंदणी क्रमांक AATN2310GE20214 व 80 G चा नोंदणी क्रमांक AATN2310GF20214 असा आहे. तसेच कंपनी कायदा, २०१३ च्या सामाजिक उत्तरदायित्व धोरण (CSR) सुधारणा नियमांनुसार समितीला CSR-1 अंतर्गत नोंदणी केलेली असून त्याचा नोंदणी क्रमांक CSR00001230 आहे. आयकर कायद्याच्या नियमानुसार समितीस प्राप्त झालेल्या देणगीसंदर्भातील माहिती फॉर्म 10 BD च्या स्वरूपात आयकर विभागाच्या पोर्टलवर देण्यात आली असून देणगीदारांना फॉर्म 10 BE च्या स्वरुपात प्रमाणपत्र देण्यात आले.

या आर्थिक वर्षात कार्यकारी समितीच्या ११ सभा झालेल्या असून त्या पुढीलप्रमाणे -: दि. २५ मे २०२१, २७ जून २०२१, २४ जुलै २०२१, २८ ऑगस्ट २०२१, २५ सप्टेंबर २०२१, २३ ऑक्टोंबर २०२१, २७ नोव्हेंबर २०२१, २५ डिसेंबर २०२१, २६ जानेवारी, २०२२, २६ फेब्रुवारी २०२२, २६ मार्च २०२२

| अनु. क्र. | कार्यकारिणी सदस्य | पदनाम | उपस्थित सभा संख्या |
|---|---|---|---|
| १. | **डॉ. श्रीकांत बडवे** | अध्यक्ष | ०७ |
| २. | **डॉ. हेमा कण्णन** | उपाध्यक्षा | ११ |
| ३. | **श्री. श्रीराम दांडेकर** | कार्याध्यक्ष | ०६ |
| ४. | **श्री. सतीश जेऊरकर** | कोषाध्यक्ष | ०५ |
| ५. | **श्री. अविनाश खरे** | मानद् सचिव | ११ |
| ६. | **श्रीमती सुमेधा जोशी** | सह सचिव | ०८ |
| ७. | **श्री. जनार्दन कढे** | सदस्य | १० |
| ८. | **डॉ. जयंत पटवर्धन** | सदस्य | ०२ |
| ९. | **श्री. किरण करलकर** | सदस्य | ०९ |
| १०. | **श्री. विवेक छत्रे** | सदस्य | ०९ |
| ११. | **श्री. नितीन देशमुख** | सदस्य | ०९ |
| १२. | **श्री. प्रसन्न जोशी** | सदस्य | १० |
| १३. | **श्री. प्रविण परब** | सदस्य | ११ |
| १४. | **श्री. दिलीप केतकर** | स्वीकृत सदस्य | ०८ |
| १५. | **श्रीमती भारती वैद्य** | स्वीकृत सदस्य | ०२ |

# प्रगतीदर्शक वाटचाल

१९६८ **नाना पालकर स्मृती समिती :** १ मार्च, १९६८

असाध्य रोगाने पीडित, गरीब रुग्णांची यथाशक्ती सेवा करण्याच्या भावनेतून १ मार्च १९६८ रोजी समितीची स्थापना करण्यात आली. समाजातील गरीब आणि गरजू रुग्णांना त्यांच्या उपचारादरम्यान आधार, मार्गदर्शन व सर्व शक्य वैद्यकीय मदत देण्याच्या उद्देशाने समितीने सेवाकार्याला सुरुवात केली. समाजाची आरोग्याच्या दृष्टीने निकड विचारात घेता पुढील काळात समितीने अनेक समाजोपयोगी उपक्रम सुरु केले. आज हे सर्व उपक्रम रुग्णांना आधारवड ठरले आहेत.

गंभीर रोगावरील उपचारांसाठी अनेक रुग्ण देशाच्या कानाकोपऱ्यातून मुंबईत उपचारांसाठी येत असतात. बहुतेकदा हा त्यांच्यासाठी क्लेशकारक तथा विस्मयकारक अनुभव असतो. कारण यातील अनेकजण अत्यंत गरीब असून पहिल्यांदाच मुंबईत आलेले असतात. त्यांचे मार्गदर्शन करण्यासाठी मुंबईत त्यांचे कोणतेही मित्र किंवा नातेवाईक नसतात. या परिस्थितीत समिती त्यांना परळ विभागात निः शुल्क निवास व्यवस्था उपलब्ध करून देते. रुग्ण व त्याच्या नातेवाईकांना "घरापासून दूर - परंतु आपले घर असावे व वाटावे'' ही संकल्पना. त्यांना रुग्णालय आणि वैद्यकीय प्रक्रियेबद्दल अभिमुखता प्रदान करून अनेक अडचणींवर मात करण्यास मदत करते. समितीने सुरुवातील केईएम रुग्णालयाजवळील एका लहान खोलीत रुग्णांना निवारा देण्यास सुरवात केली. ही सुविधा अत्यंत कमी प्रमाणात म्हणजे चार रुग्ण व त्यांचे नातेवाईक अशी सुरू झाली. आज त्याचा विस्तार ७६ रुग्ण व त्यांचे नातेवाईक असे मिळून साधारण २२८ लोकांच्या राहण्याची विनामूल्य व्यवस्था केली जाते.

१९७३ **संस्थेचे नोंदणीकरण :**

नाना पालकर स्मृती समिती ही धर्मादाय संस्था सन १९६८ साली स्थापन झाली असून सार्वजनिक धर्मादाय विश्वस्त कायदा १९५० तथा सोसायटी नोंदणी अधिनियम कायदा १९३० अंतर्गत धर्मादाय आयुक्तालय, मुंबई यांच्याकडे नोंदणीकृत करण्यात आलेली आहे.

१९९० **नाना पालकर स्मृती समिती ची बोरीवली शाखा :** १७ जून, १९९०

स्व. श्रीमती वत्सला रेगे यांनी समितीला दान केलेल्या जागेमध्ये दिनाक १७ जून १९९० साली बोरीवली केंद्राची सुरुवात झाली. या केंद्रामध्ये रुग्णपयोगी वस्तू म्हणजे फाउलर बेड, व्हीलचेअर, कमोड चेअर, वॉटर बेड, ऑक्सिजन मशिन्स आदी वस्तू नाममात्र दरात गरजवंताना वापरसाठी दिल्या जातात. तसेच अनेक व्याधीसाठी अनुभवी डॉक्टरांकडून नाममात्र दरात बाह्य रुग्ण विभाग चालविला जातो. याशिवाय केंद्राच्या परिसरातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या भागात, तसेच शाळांमधून मोफत वैद्यकीय आरोग्य शिबिराचे आयोजन केले जाते. रक्तदानाचे महत्त्व लक्षात घेऊन या केंद्रामार्फत वर्षातून एकदा रक्तदान शिबिराचे आयोजन केले जाते. केंद्रामार्फत वैद्यकीय सेवा देण्याचे कार्य अविरत वर्धिष्णूपणे सुरू आहे.

१९९७ **रुग्ण सेवा सदन :** १३ एप्रिल १९९७

''स्वप्नपूर्ती चा दिवस''. मुंबई महानगर पालिकेकडून परळ येथे भाडे पट्टयाने एक भूखंड प्राप्त झाला. यावर रुग्ण सेवा सदनाची ७ मजली इमारत अथक परिश्रमातून उभी राहिली. परम पूज्य श्री पांडुरंग शास्त्री आठवले यांच्या शुभहस्ते ''रुग्णा सेवा सदन'' चे औपचारिक उद्घाटन झाले. या सोहळ्यास राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तत्कालीन सरसंघचालक, श्री राजेंद्र सिंहजी उर्फ "रज्जू भैया'' उपस्थित होते. सुरुवातीला, रुग्णांची संख्या सरासरी साधारणपणे पंधरा होती परंतु जेव्हा सर्व सुविधा उपलब्ध झाल्या तेव्हा ६० रुग्ण व त्यांचे १२० नातेवाईक इतक्या

लोकांची निवास व्यवस्था सदनात होऊ लागली. रुग्ण अल्प काळासाठी आपल्या पीडा विसरू शकेल यासाठी योग्य वातावरण देखील आवश्यक असते. अशा प्रसंगी आपण एकचित्त होऊन ईश्वराला शरण जातो. यासाठी सदनाच्या तळ मजल्यावरील दालनात गणरायाच्या मूर्तीची विधिवत स्थापना करण्यात आली.

**उपहार गृह :** १९ जून, १९९७

सदनातील सर्वांनाच नुसती निवास व्यवस्था देऊन भागण्यासारखे नव्हते. येणाऱ्या सर्वांना भोजन, चहा-पान, न्याहारी वगैरे व्यवस्थित मिळावी या हेतूने उपहारगृह सुरु करण्यात आले. सदनाच्या तिसऱ्या मजल्यावर उपहारगृह सुरु केले. सदनात येणारे रुग्ण व त्यांचे नातलग यांची ही गरज संस्थेने पूर्ण केली. रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना १० रुपयात जेवण व ५ रुपयात न्याहरीची व्यवस्था करण्यात आली.

१९९८ **रक्तदान शिबिर :** ३ मार्च, १९९८

''रक्तदान - श्रेष्ठ दान.'' रुग्णांच्या सेवेचे व्रत घेतलेल्या नाना पालकर स्मृती समितीने रक्तदानाचे महत्त्व जाणले आणि रक्तदान शिबिराचे आयोजन करुन आणखी एका रुग्णोपयोगी कार्यास सुरुवात केली. स्वेच्छेने रक्तदान करणाऱ्या अनेक रक्तदात्यांची सुची समितीकडे आहे. दिवस-रात्र विविध रक्तपेढ्याशी संपर्क वाढवून रुग्णांना रक्त मिळवून देणे, तसेच रक्तदाता उभे करणे हे कार्य जोरात सुरु झाले. आज नाना पालकर स्मृती समिती तर्फे वर्षातून किमान तीन रक्तदान शिबिरे आयोजित केली जातात. परळ, बोरीवली व मुंबई सेंट्रल अश्या विविध ठिकाणी हे काम सुरु आहे. तातडीची सोय म्हणून समितीचे कार्यकर्ते दुरध्वनीवर संपर्क करुन रक्तदाता व रुग्ण यांची भेट घालून देतात व त्याची रक्ताची गरज पुरविली जाते.

**रुग्णवाहिका सेवा :** ३१ डिसेंबर, १९९८

रुग्णांची सेवा करताना रुग्णवाहिका असणे आवश्यक असते. रुग्णांना रुग्णालय ते सदन, एका रुग्णालयातून दुसऱ्या रुग्णालयात घेऊन जाणे, बाहेरच्या रुग्णांना स्टेशनवरुन आणणे अथवा स्टेशनवर सोडणे इत्यादीसाठी रुग्णवाहिकेचा उपयोग होतो. यासाठी समितीने रुग्णवाहिकेची सेवा सुरू केली. सदनातील रुग्णासाठी ही सेवा विनामूल्य दिली जाते. याव्यतिरिक्त बाहेरील रुग्णांना अत्यंत नाममात्र दरात रुग्णवाहिका सेवा उपलब्ध करून दिली जाते.

२००० **मधु औषध पेढी / रुग्णांना वैद्यकीय आर्थिक मदत :**

रुग्णाच्या आजाराचे स्वरुप, त्यासाठी येणारा खर्च, त्याची आर्थिक क्षमता लक्षात घेऊन रुग्णाला मदत केली जाते. यासाठी समितीने स्वतंत्र निधीची तरतूद केलेली आहे. शहरातील सरकारी रुग्णालयात उपचार घेणाऱ्या गरीब आणि गरजू रुग्णांना त्यांचे उपचार आणि शस्त्रक्रियेसाठी आर्थिक सहाय्य केले जाते.

**अन्नपूर्णा योजना :**

कर्करोगाचा उपचार वेदनादायक आणि रुग्णाला दुर्बल करणार आहे. या रुग्णांना प्रतिकार शक्ती वाढविण्यासाठी आणि उपचाराचे दुष्परिणाम कमी करण्यासाठी पौष्टिक अन्नाची आवश्यकता आहे. रुग्ण गरीब कुटूंबातील असल्याने २-३ व्यक्तींचा अन्नाचा खर्च त्यांना परवडत नाही. मग ते रस्त्याच्या कडेला अन्न घेतात जे अस्वच्छ असते. या समस्येवर मात करण्यासाठी समितीने सदनाच्या तिसऱ्या मजल्यावर उपाहारगृहाची सुविधा सुरू केली. जिथे १५ रुपयात न्याहारी आणि प्रत्येकी ३० रुपयांत दुपारचे व रात्रीचे जेवण याची सोय करण्यात आली. पण हा खर्चही रुग्णांसाठी खूप जास्त आहे. म्हणून समितीने वैयक्तिक देणगीदारांच्या मदतीने रुग्ण सेवा सदनात रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना अन्नपूर्णा योजने अंतर्गत सकाळ-संध्याकाळचे भोजन व सकाळची न्याहारी फक्त रु. २५

या नाममात्र दरात देण्यास सुरुवात केली. तसेच अन्नपूर्णा योजने अंतर्गत खालील उपक्रम राबविले जातात.

- समितीतर्फे रोज टाटा रुग्णालयाच्या पदपथावरील रुग्णांच्या नातलगांना १८५ कप चहा दिला जातो. यासाठी गुरुनानी सती चॅरिटेबल ट्रस्ट यांचे आर्थिक सहाय्य लाभले आहे.
- वाडीया बाल रुग्णालयातील बाल रुग्णांच्या मातांना ५० कप चहा दिला जात असून यासाठी ''साई इन्फोटेक'' यांचे आर्थिक सहाय्य लाभले आहे. तसेच वाडीया रुग्णालयात दाखल केलेल्या ३०० बाल रुग्णांना संध्याकाळचा नाष्टा दिला जातो. यासाठी गौरीशंकर छितरमल मिठाईवाले यांचे आर्थिक सहाय्य लाभले आहे.
- वाडीया बाल रुग्णालयातील सुमारे ५० मातांना व के. ई. एम. मधील सुमारे १५० रुग्णांच्या नातेवाईकांना पोळी भाजी दिली जाते. यासाठी रोटरी क्लब नरीमन पॉईंट यांचे अर्थसहाय्य लाभले आहे.
- समितीकडून नायर रुग्णालयात दाखल केलेल्या रुग्णांच्या नातेवाईकांना रोज २०० पोळ्यांचे वाटप केले जाते.

२००१ **रुग्ण सेवा सदन मार्ग :**

ज्या ठिकाणी रुग्ण सेवा सदन दिमाखात उभे आहे, त्या रस्त्याचे जुने नाव चमारबाग क्रॉस स्ट्रीट असे होते. समितीच्या उत्तम कार्याकडे पाहून या रस्त्याचे नामकरण "रुग्ण सेवा सदन मार्ग'' करण्यात आले. समितीच्या उत्तम कार्याची ही पावतीच आहे.

**फळ वाटप योजना :** जानेवारी २००१

दर गुरुवारी समितीमार्फत शिवडी येथील क्षयरोग रुग्णालयात रुग्णांना ५ ते ६ फळांचे वाटप केले जाते. या रुग्णालयात साधारण ६०० रुग्ण असतात.

**मसाज प्रशिक्षण वर्ग :** जानेवारी २००१

मसाज ही एक प्राचीन मान्यताप्राप्त भारतीय कला आहे. शास्त्रशुद्ध मसाजमुळे अनेक व्याधी आटोक्यात आणता येतात. या कलेचे शिक्षण व माहिती प्रात्यक्षिकांसह शनिवार-रविवारच्या वर्गामधून दिली जाते. चार शनिवार व चार रविवार, संध्याकाळी ४ ते ८ असा एक महिन्याचा वर्ग प्रात्यक्षिकांसह तज्ञ व अनुभवी प्रशिक्षकांकडून चालविला जातो. वैद्य श्री. प्रकाश दळवी हे सध्या मसाज कलेचे प्रशिक्षण देत आहेत.

**योग वर्ग :**

मानसिक व शारिरीक स्वास्थ्य टिकवून वृद्धिंगत करण्याची विश्वमान्यता मिळालेली भारतीय पध्दती म्हणजे योग. योगाभ्यासातून मन शरीर, स्वस्थ ठेवता येतेच परंतु धार्मिक पातळीवरही स्वतःला प्रस्थापित करता येते. आजच्या धकाधकीच्या जीवनात योग मन व शरीर स्वास्थ्य देऊ शकतो. नाना पालकर स्मृती समितीने ''योग विद्या निकेतन'' यांच्या सहकार्याने सदनात योग वर्गाचे आयोजन सुरु केले. सोमवार ते शुक्रवार सायं. ४.३० ते ८.०० या वेळेत योग वर्ग चालवले जातात. योग विद्या निकेतन तर्फे श्री. आर. पी. पाटील व श्रीमती निलीमा रेळे हे अनुभवी व तज्ञ योग शिक्षक या वर्गातून मार्गदर्शन करतात. तसेच सदनातील रुग्ण व त्यांचे नातेवाईक यांना देखील दर मंगळवारी व शुक्रवारी योगशिक्षिका श्रीमती वंदना शिंत्रे यांच्याकडून योगाभ्यास शिकविला जातो.

**'रुग्ण मित्र' - त्रैमासिक :** २५ मार्च, २००१

रुग्ण मित्र हे त्रैमासिक समिती मार्फत प्रकाशित केले जात असून समितीशी संलग्न असलेले सभासद, देणगीदार आणि हितचिंतकांना हा अंक विनामूल्य पाठवला जातो. रुग्ण मित्र या त्रैमासिकात समितीचे विविध उपक्रम व येणारे नवे उपक्रम, तीन महिन्यात घडलेल्या विशेष घटना यांची माहिती दिली जाते. श्री. भालचंद्र बोपर्डीकर हे या त्रैमासिकाच्या संपादकाचे काम पाहत होते. त्यांच्या निधनानंतर श्री. विवेक छत्रे हे संपादकाचे काम पहात असून श्रीमती निता नाग या कामात सहकार्य करीत आहेत.

**क्षयरोग उपचार केंद्र :** १५ ऑगस्ट, २००१

मुंबई शहरामध्ये दूषित हवेमुळे क्षयपिडीत रुग्णांची संख्या वाढत आहे. बहुसंख्य क्षयरुग्ण अर्थिक दुर्बल गटातील असल्याने औषध खर्च आवाक्याबाहेरचा असतो. हा विचार करून समितीने अनुभवी क्षयरोग तज्ञ डॉ. कमलाकर कुलकर्णी यांची नियुक्ती केली आहे. ते आठवड्यातून एक दिवस सदनात येऊन रुग्णांची तपासणी करतात व रुग्णांना मोफत औषधे दिली जातात.

२००२ **रुग्ण सेवा दिन :** २० एप्रिल, २००२

नाना पालकरांच्या जन्मदिना निमित्ताने हा दिवस साजरा केला जातो. समाजात विशिष्ट ध्येय ठेवून स्वतःच्या समाधानासाठी तसेच प्रसिद्धीची अपेक्षा न ठेवता काही व्यक्ती आरोग्य क्षेत्रात परिवर्तनाचे काम करत असतात. अशा व्यक्तींना प्रोत्साहन देणे ही सामाजिक जबाबदारी आहे. याच उद्देशाने समिती मार्फत या दिवसाचे औचित्य साधून आरोग्य क्षेत्रात लक्षणीय काम करणाऱ्या व्यक्तींचा ''सेवाव्रती पुरस्कार'' देवून सत्कार केला जातो.

२००३ **प्रभाकर कुटुंब कल्याण केंद्र :** १६ मार्च, २००३

समितीच्या बहुआयामी सेवाकार्याला एक नवा आयाम जोडावा या कल्पनेने 'प्रभाकर कुटुंब कल्याण केंद्र' सुरु झाले. समाजातील अनेक व्यक्तींना HIV/AIDS सारख्या व्याधींनी ग्रासले असल्याचे आपण पाहतो. त्याचबरोबर कर्करोग, किडनी चे आजार, मधुमेह इत्यादी आजारांनी समाजातील घटक बाधित आहेत. या लोकांच्या अडचणी समक्ष जाणून योग्य तो सल्ला या केंद्रामध्ये दिला जातो. श्रीमती मती महेंद्र या केंद्रामध्ये समुपदेशनाचे काम पाहतात.

**नाना पालकर चिकित्सालय :** २९ सप्टेंबर, २००३

नाना पालकर स्मृती समितीतर्फे सदनातच समान्य जनतेसाठी बाह्य रुग्णांची तज्ञ डॉक्टरांकडून तपासणी केली जाते व योग्य उपचार आणि औषधे देण्याची सोय रुग्णसेवा सदनातच केलेली आहे.

२००४ **डॉ. शिवानंद लवेकर दवाखाना :** २२ फेब्रुवारी, २००४

सामान्य व गोर-गरीब जनतेसाठी वैद्यकीय सल्ला, औषधे, इंजेक्शन अत्यंत नाममात्र दरात उपलब्ध व्हावी म्हणून टाटा हॉस्पिटल समोर श्रद्धा इमारतीमध्ये नाना पालकर स्मृती समिती मार्फत ''डॉ. शिवानंद लवेकर दवाखाना'' चालविला जातो. सन २००४ साली श्रीमती डॉ. शैलजा लवेकर यांनी, आपले दिवंगत पती कै. डॉ. शिवानंद लवेकर यांचा दवाखाना नाना पालकर स्मृती समितीला वैद्यकीय सेवेसाठी विनामूल्य दिला . डॉ. मयुर जोगीदासनी या तज्ज्ञ, अनुभवी व सेवाभावी डॉक्टरांच्या सहयोगाने सल्ला व उपचार या दिले जातात.

**रुग्ण सेवा सदनाचे वाढीव तीन मजले :** ३० मार्च, २००४

समितीचे बहुआयामी सेवाकार्य विचारात घेऊन महानगरपालिकेने सदनाच्या इमारतीवर आणखी तीन मजले उभारण्याची परवानगी दिली. रुग्ण सेवा सदनाची १० मजली वस्तू आज दिमाखात उभी आहे. या तीन मजल्यांचे उद्घाटन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तत्कालिन सरसंघचालक परमपूज्य के. सुदर्शनजी यांच्या शुभहस्ते झाले.

**गोखले डायलिसीस केंद्र :** १३ जून, २००४

मानवी शरीरातील मुत्रपिंड निकामी झाल्यावर त्या व्यक्तींना नियमीत डायलिसीस करणे आवश्यक असते. डायलिसीस ही एक खर्चिक उपचार पद्धती आहे. रुग्ण सेवा सदनाच्या ९ व्या मजल्यावर डायलिसीस सेवा सुरु करण्याच्या दृष्टीने निर्णय घेण्यात आला. सुरुवातीला चार डायलिसीस यंत्र ''गोविंद दत्तात्रय गोखले चॅरिटेबल ट्रस्ट' यांनी देऊन डायलिसीस केंद्र सुरु करण्यासाठी सढळहस्ते मदतही केली. डायलिसीस उपचारासाठी रुग्णांकडून अतिशय नाममात्र दर (रुपये ३५०/-) आकारला जातो. केंद्र सुरु झाल्यापासून हेच शुल्क आकारले जात होते. मागील दोन वर्षापासून सामाजिक दायित्व निधी (CSR) योजने अंतर्गत समितीने रुग्णांना मोफत डायलिसीस सेवा देण्यास सुरुवात केलेली आहे. आज आपल्या डायलेसीस केंद्रामध्ये १४ डायलिसीस यंत्र असून तीन सत्रांमध्ये केंद्र कार्यरत आहे. डॉ. तुकाराम जमाले, डॉ. अहमद पठाण आणि डॉ. अतिम पजाई यांच्या मार्गदर्शनाखाली गोखले डायलेसीस केंद्र सुरु आहे.

२००६ **तुलसियानी रक्त तपासणी केंद्र :** १ एप्रिल, २००६

रुग्ण सेवा सदनच्या ८ व्या मजल्यावर 'सुमन रमेश तुलसियानी स्पेशालिटी लॅबोरेटरी' ही अत्याधुनिक रक्त तपासणी प्रयोगशाळा तुलसियानी उद्योजक कुटुंबाच्या आर्थिक सहाय्यातून सुरु करण्यात आली. अत्याधुनिक यंत्रांवर सर्व प्रकारच्या रक्त तपासण्या या प्रयोगशाळेत केल्या जातात. या केंद्रात अत्यल्प दरात रक्त तपासणी केली जाते. डॉ. प्रशांत आमोणकर यांच्या मार्गदर्शनाखाली हे रक्त तपासणी केंद्र कार्यरत आहे. सदनात राहणारे रुग्ण, डायलिसीस रुग्ण तसेच सर्व सामान्य व गोर-गरीब जनतेस तुलसीयानी रक्त तपासणी केंद्र वरदान ठरत आहे.

२००८ **ठाणे केंद्र :** २० एप्रिल, २००८

सेवाभावी कार्यकर्त्यांच्या अथक प्रयत्नातून नाना पालकर स्मृती समिती ने ठाण्यात आपली आणखी एक केंद्र सुरु केले. कै. राजा वैद्य यांनी ठाण्यात अन्य सहकार्यांच्या मदतीने गरीब गरजू रुग्णांना मदत करण्यास सुरुवात केली. या केंद्रातर्फे सरकारी सुतिकागृहात जन्मलेल्या नवजात बालकांना प्रत्येक महिन्याला कपड्यांचे वाटप केले जाते. सरकारी रुग्णालयातील गरजू मातांना सकस आहाराचीही व्यवस्था केली जाते. थेऊर येथील गरीब विद्यार्थ्यांना शालेयोपयोगी साहित्य आणि सकस आहार दिला जातो. मुलांची आरोग्य तपासणी शिबिरेही आयोजित केली जातात. ज्येष्ठ नागरीक व रुग्णांना रुग्णोपयोगी वस्तू तात्पुरत्या स्वरुपात नाममात्र दरात घरी वापरण्यासाठी दिली जातात.

२०१० **राष्ट्रीय डॉक्टर दिन :** १ जुलै, २०१०

डॉक्टर बिधान चंद्र रॉय यांच्या स्मरणार्थ देशभर 'डॉक्टर्स दिन' साजरा केला जातो. या दिवसाचे औचित्य साधून समितीमार्फत विविध क्षेत्रात सेवाभावी वृत्तीने काम करणाऱ्या डॉक्टरांचा सत्कार केला जातो. निःस्वार्थपणे समाजातील गरीब रुग्णांवर उपचार करणाऱ्या, विनाशुल्क शस्त्रक्रिया करणाऱ्या सेवाभावी डॉक्टरांचा शोध घेऊन दरवर्षी या दिवशी तीन डॉक्टरांचा सत्कार केला जातो. उदात्त हेतूने काम करणाऱ्या डॉक्टरांना समाजासमोर आणण्याचे व त्यांच्या कार्याचे कौतुक करण्याचे अविरत कार्य समिती करत आहे.

२०१२ **बोरीवली केंद्र नवीन वास्तूत : -**

बोरीवलीचे खासदार मा. गोपाळ शेट्टी यांच्या प्रयत्नातून बोरीवली केंद्राला मोठी जागा उपलब्ध झाली. या केंद्रात रुग्णोपयोगी वस्तू अल्पदरात देण्याव्यतिरिक्त वैद्यकीय क्षेत्रात फार मोठे काम सुरु झाले. समाजातील गरीब व गरजू रुग्णांना माफक दरात रुग्ण सेवा व उपचार उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीकोनातून केंद्रामार्फत तज्ञ व अनुभवी डॉक्टरांकडून बाह्य रुग्ण विभागाची सोय करण्यात आली आहे. विविध व्याधींवरील नामवंत डॉक्टर्स येथे येतात व त्यांची सेवा समाजाला अत्यल्प दरात उपलब्ध करून देतात. होमियोपॅथी, आयुर्वेदीक, फिजिओथेरपी यांसारख्या सेवा देखील या केंद्रावर उपलब्ध आहेत.

२०१८ **सांताक्रुझ डायलेसीस केंद्र :** १ जून, २०१८

नाना पालकर स्मृती समितीने 'संकल्प ट्रस्ट' च्या डायलेसीस केंद्राची जबाबदारी स्विकारली. १२ डायलिसीस यंत्र असलेले हे केंद्र आता समिती मार्फत चालविले जाते. समितीने या केंद्राची जबाबदारी घेतल्यानंतर आता हे केंद्र तीन सत्रात सुरु झाले आहे. इथेही समितीने गोर-गरीब रुग्णांसाठी डायलिसीस सेवा उपलब्ध केली आहे. या केंद्रामध्ये अल्प दरात रक्त तपासणी देखील केली जाते.

**ठाणे केंद्र येथे फिजीओथेरपी उपक्रमाची सुरुवात :** ऑक्टोबर २०१८
आजकालच्या तणावपूर्वक जीवनशैलीमुळे स्पाँडीलायसिस, गुडघेदुखी, कंबर दुखी हे प्रश्न वाढत आहेत या दृष्टीने ठाणे केंद्रात सामान्य जनतेसाठी नाममात्र दरात फिजीओथेरपी कक्ष कार्यान्वीत करण्यात आला.

**कै. नाना पालकर यांची जन्मशताब्दी व नाना पालकर स्मृती समितीचे सुवर्ण जयंती वर्षः**
नाना पालकर यांची रुग्णांविषयीची तळमळ व त्यांनी केलेले रुग्णसेवेचे कार्य अखंडपणे चालू ठेवण्यासाठी सन १९६७ साली नाना पालकर स्मृती समितीची स्थापना करण्यात आली. सन २०१८-१९ हे नाना पालकर यांचे जन्मशताब्दी वर्ष व नाना पालकर स्मृती समितीचे सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करण्यात आले. दिनांक २४ ऑगस्ट २०१८ रोजी या जन्मशताब्दी व सुवर्ण महोत्सवी वर्षाचा सांगता सोहळा आयोजित करण्यात आला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक, डॉ. मोहनराव भागवत यांच्या हस्ते हा सोहळा समारंभपूर्वक संपन्न झाला. तसेच या कार्यक्रमास भारतातील राष्ट्रप्रेमी उद्योगपती श्री. रतन टाटा हे विशेष अतिथी लाभले हा एक दुग्धशर्करा योगच होता.

२०२० **महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना**
समितीची परळ व सांताक्रुझ ही दोन्हीही डायलिसिस केंद्रे महाराष्ट्र शासनाच्या 'महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजने'मध्ये अंगीकृत करण्यात आली आहेत. या योजनेमुळे दोन्ही केंद्रामधील डायलिसिस रुग्णांना मोफत डायलिसिस सेवा प्रदान करण्यात येत आहे. गरीब व गरजू डायलिसिस रुग्णांना याचा फार मोठा लाभ होत आहे.

**बोरीवली डायलिसिस केंद्र**
सार्वजनिक खाजगी सहभाग प्रोत्साहन धोरणा अंतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक विभागामार्फत समितीस बोरीवली येथे १० वर्षाच्या कालावधीसाठी डायलिसिस केंद्राकरीता जागा देण्यात आली. दि. १५ ऑगस्ट २०२० रोजी या डायलिसिस केंद्राचा उद्घाटन समारंभ पार पडला व दि. १० सप्टेंबर २०२० पासून डायलिसिस केंद्र नियमितपणे सुरु करण्यात आले.

२०२१ **नाना पालकर स्मृती समिती मार्ग, बोरीवली :** २५ डिसेंबर २०२१
समितीच्या बोरीवली येथील रुग्णसेवा केंद्रा समोरील रस्त्याला महानगर पालिकेमार्फत 'नाना पालकर स्मृती समिती मार्ग' असे नाव देऊन गौरविण्यात आले.

**'ध्यास सन्मान' पुरस्कार :**
ग्रंथाली आणि ॲडफीज यांच्यातर्फे समितीस 'ध्यास सन्मान' हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

**'इंटरनॅशनल लाईफ सेव्हर अवॉर्ड'**
वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्डस्, इंग्लंड यांच्यातर्फे आयोजित रक्तदाबन शिबिरामध्ये सहभागी झाल्याबद्दल 'इंटरनॅशनल लाईफ सेव्हर अवॉर्ड'ने समितीस सन्मानित करण्यात आले.

**भावपूर्ण श्रद्धांजली :-** समितीचे सचिव **श्री. अविनाश खरे** यांचे आकस्मिक निधन झाले. त्यांच्या जाण्याने समितीने एक दूरदृष्टी असलेले व चतुरस्त्र व्यक्तिमत्व कायमचे गमावले. समिती त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहे.

# अभिप्राय

Nana Palkar Smruti Samiti is doing a phenomenal job in serving the cancer affected patient & their families by providing them a clean & hygienic stay! In addition to this, the facility is well equipped with trained staff to run pathological test of the patient, including dialysis.
The entire organisation runs like a clock, with humane approach by an extremely efficient & dedicated management committee & support staff! We complement them for their commendable work & wish them the best!

***-- Sumantra Mitra***
*Vice President, Human Resources*
*Glenmark Life Sciences Limited*

